# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### मराठा आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत

**(१) २७२५२ (१२-०६-२०२१). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.राहूल कुल (दौंड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विधानमंडळाने एकमताने संमत केलेला मराठा आरक्षणाचा कायदा, तत्कालीन शासनाच्या काळात, उच्च न्यायालयात वैध ठरला होता तसेच मा.सर्वोच्च न्यायालयानेही त्याला अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला असूनही, दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.सर्वोच्च न्यायालयाने सदर कायदा रद्दबातल ठरवला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनामधील असमन्वय, विधिज्ञाना योग्य त्या सूचना वेळेवर दिल्या न जाणे, मागासवर्ग (गायकवाड) आयोगाच्या अहवालाच्या परिशिष्टांचा इंग्रजीमधील अनुवाद मा. न्यायालयापुढे सादर करण्यात न येणे यासारख्या काही बाबी, अन्य बाबींबरोबरच, हा कायदा रद्द होण्यास कारणीभूत ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एखाद्या समाजाला मागास ठरवण्याचा अधिकार राज्य शासनाच्या शिफारशीवरून मा.राष्ट्रपतीना आहे व त्यासंबंधात कायदा करण्याचा राज्य सरकारचा अधिकार अबाधित आहे, हेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावरून स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा अभ्यास करण्यासाठी शासनाने निवृत्त न्यायमूर्ती यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे, या समितीची रचना व कार्यकक्षा काय आहे तसेच समितीला अहवाल सादर करण्यासाठी किती कालावधी देण्यात आला आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने मागासवर्ग आयोग स्थापन करून त्याच्या शिफारशी राष्ट्रपतींना सादर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही, १०२ व्या घटना दुरुस्तीनुसार एखाद्या समाजाचा सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गात समावेश करुन त्यास आरक्षण देण्याचा अधिकार राज्यांना नाही असे मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या दि. ५ मे, २०२१ च्या न्यायनिर्णयात स्पष्ट केले आहे.

(४) व (५) मराठा आरक्षणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयातील सिव्हिल अपील क्र. ३१२३/२०२० जयश्री लक्ष्मणराव पाटील विरुध्द मुख्यमंत्री प्रकरणी दिनांक ०५.०५.२०२१ रोजीच्या दिलेल्या निर्णयाची समिक्षा करण्यासाठी दि. ११.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये माजी न्यायाधिश श्री. दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यांची समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीस मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन पुढील कार्यवाहीची दिशा ठरविण्याबाबत शासनास मार्गदर्शनात्मक / सूचनात्मक अहवाल दि. ३१.०५.२०२१ पर्यंत सादर

करण्याबाबत सांगण्यात आले होते. त्यानुसार, सदर समिक्षा समितीने दिनांक ०४.०६.२०२१ रोजी शासनाकडे अहवाल सादर केला असून समितीने केलेल्या सुचनांनुसार शासनामार्फत मराठा आरक्षण प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयात पुर्नविलोकन याचिका करण्यात आली आहे व इतर कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तारापूर (जि.पालघर) औद्योगिक विकास महामंडळातील प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२) २७९७४ (१८-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापुर (जि.पालघर) औद्योगिक विकास महामंडळातील सीईटीपी प्लाँटच्या हरित लवादाने प्रदुषण प्रकरणी १०२ कोटीचा दंड आकारण्यात येऊनही संबंधित कंपन्यांनी प्रदुषण रोखण्यासाठी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे सुमारे ६०० कंपन्या बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्याच्या करोना साथीच्या काळात शासनाचे महसुली उत्पादनाचे नुकसान होऊ नये यासाठी शासनाने उक्त कंपन्यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन करुन व त्यानुसार सांडपाणी प्रक्रिया राबवून, कंपन्या सुरु ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) तारापूर औद्योगिक वसाहतीतील उद्योगांतून निर्माण होणाऱ्या उच्च सिओडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर यंत्रणा उभारल्यानंतर सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत येणाऱ्या सांडपाण्याची गुणवत्ता सुधारुन त्यामुळे सामुहिक प्रक्रिया यंत्रणेत सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया होऊन जास्तीचे प्रदूषण कमी होण्यास मदत होणार आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुरकुंभ (ता.दौंड, जि. पुणे) येथिल औद्योगिक वसाहतीतील रसायनयुक्त सांडपाणी रस्त्यावर सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३) ३०१४४ (११-०६-२०२१). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरकुंभ (ता.दौंड,जि. पुणे) येथे पावसाळ्यात औद्योगिक वसाहतीतील केमिकल कंपन्यांमधील रसायनयुक्त सांडपाणी मुख्य रस्तावर साचत असल्याचे दिनांक ३१ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी येथील प्रकल्पातून निघणारे दुषीत सांडपाणी सामाईक प्रक्रीया केंद्रात प्रक्रिया करण्यासाठी सोडल्या जाणाऱ्या सर्व ठिकाणांना प्रांताधिकारी व तहसीलदार यांनी भेट देऊन सूचना केल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी केल्या असल्याने पावसाचा फायदा घेऊन सांडपाणी रस्त्यावर सोडणाऱ्या कंपन्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील उद्योगांची पाहणी करण्यात आली असून

दोषी आढळून आलेल्या ०३ उद्योगांना उत्पादन बंदीचे आदेश, १४ उद्योगांना प्रस्तावित आदेश व एका उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कुरकुंभ एन्वार्यमेंट प्रोटेक्शन सोसायटी (CETP) या संस्थेस व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, बारामती यांना जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ व हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अन्वये दिनांक ०२/०६/२०२१ रोजी निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सुरु करण्यात आलेले साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ सुरु करण्याबाबत

**(४) ३४९५४ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.इंद्रनिल नाईक (पुसद), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुरु करण्यात आलेले साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ सध्या बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकास महामंडळ बंद असल्यामुळे मातंग समाजातील सुशिक्षित बेरोजगाराच्या संख्येत वाढ झाली असून त्यांना मदत मिळत नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, बंद असलेले अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणात काजू बोर्ड स्थापन करण्याच्या मागणीबाबत

**(५) ३५०३२ (०७-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रक्रिया करणाऱ्या कंपन्या व घाऊक व्यापारी यांचे शेतकरी विरोधी धोरण तसेच वाढता व्यवस्थापन खर्च आणि हवामानातील सततच्या बदलामुळे कोकणातील काजू उत्पादक शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणात काजूला हमीभाव देवुन काजू उदयोगाला चालना देण्यासाठी काजू बोर्डाची स्थापना करण्याची मागणी काजू उत्पादक शेतकऱ्यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२५-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) कृषी व पदुम विभागाने महाराष्ट्रातील काजूच्या सर्वंकष विकासासाठी काजू फळ पिक विकास योजना लागू करण्याबाबतच्या दि.१६.०२.२०२३ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सहकार, पणन व वस्रोद्योग विभागाच्या दि.१६.०५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील काजू फळ पिकाच्या विकासाकरिता "महाराष्ट्र राज्य काजू मंडळ" स्थापन करण्यात आले आहे. तसेच काजूला हमी भाव देणे हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील असुन, केंद्र शासनास दि.१२.०७.२०२३ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा बोरीबारा (ता. आर्वी, जि.वर्धा) येथील गाव तलावाच्या बुडीत क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे या गावाचे तात्काळ पुनर्वसन करण्याबाबत

**(६) ३५९९५ (१२-०१-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बोरीबारा (ता. आर्वी, जि.वर्धा) येथील तलावाचे बुडीत क्षेत्रात एकूण ३७ आदिवासी कोलाम समाजाचे कुटुंब राहत असून त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत अनेकदा मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, वर्धा यांचे पत्र दि. १०/०२/२०१४ रोजी कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबईमार्फत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी पाठविलेल्या प्रस्तावानुसार कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, वर्धा यांनी तेथील नागरिक प्रकल्प बाधित नसून पूरबाधित म्हणून पुनर्वसन करण्याबाबत दिनांक १२ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास महसूल व वन विभाग यांना प्रस्ताव सादर केला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ३७ आदिवासी कोलाम समाजाच्या कुटुंबांना पूरबाधित म्हणून पुनर्वसन करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१८-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) दि.१२.०७.२०१३ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे कु-हा तलाव १००% भरल्यामुळे तलाव फुटण्याच्या भिती पोटी बा-हा सोनेगाव येथील ३७ कुटुंबाचे सर्वे नं. ४४ आराजी १.३६ हे. आर या सरकारी जागेवर प्रकल्पग्रस्त पुनर्वसन करण्याबाबत शासनास दि.१०.०२.२०१४ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी शासनाने दि.११.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये जलसंपदा विभागाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांच्या दि.१२.११.२०१८ रोजीच्या अहवालामध्ये, बा-हा सोनेगाव येथील गाववासी धरणाच्या खालील बाजूस असून वेस्ट वेअरचे खोलीकरण केल्यामुळे वेस्ट वेअरचा प्रवाह सहजरित्या निघत असल्यामुळे पुनर्वसनाची आवश्यकता वाटत नसल्याचे शासनास कळविले आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## पुष्पक नोड, उलवे येथील सिडको व्यवस्थापनाकडून झालेल्या अनियमिततेप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(७) ४४५८९ (३१-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन राज्य शासनाच्या काळात आमदार पत्नीच्या नावे सिडकोने पुष्पक नोड उलवे येथे २२.५ टक्के योजनेंतर्गत वाटप केलेल्या ३५.७८० चौ.मीटर क्षेत्रफळाच्या भूखंड वाटपात सिडको व्यवस्थापनाकडून अनियमितता झाल्याचे नगरविकास विभागास आढळून आल्याने वाटप करण्यात आलेला भूखंड नगरविकास विभागाने रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडाचे बाजारमूल्य ३०० कोटीहून अधिक असल्याने सिडको व्यवस्थापनाकडून झालेल्या अनियमिततेप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०७-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे जासई, ता. उरण येथील जमिनीच्या भूसंपादनापोटी सिडको महामंडळाकडून २२.५% योजनेअंतर्गत पुष्पक नगर, सेक्टर क्र.२६-ए येथील भूखंड क्र.१ वाटपाच्या अनुषंगाने शासनास प्राप्त निवेदनामधील मुद्दे व सिडकोचा अहवाल विचारात घेवून सदर भूखंड शासनाच्या दि.२५.३.२०२२ च्या

पत्रान्वये रद्द करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने सिडकोने दि.२९.३.२०२२ रोजी सदर भूखंडाचे वाटपपत्र, करारनामा व त्रिपक्षीय करारनामा रद्द केले होते. त्याविरुध्द मा. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२०८०/२०२३ दाखल करण्यात आली होती.

सदर याचिकेमधील मा.न्यायालयाच्या दि.२२.२.२०२३ च्या आदेशानुसार सिडकोमार्फत दि.३१.३.२०२३ रोजी आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे, उत्तमनगर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मुलभूत सोयीसुविधा अभावी दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(८) ४४९६४ (२०-०९-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, उत्तमनगर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मुलभूत सोयी-सुविधाअभावी दूरवस्था झाल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी या ठिकाणी मोठ्याप्रमाणात कष्टकरी, मजूर, शेतकऱ्यांची वर्दळ असते असे असताना शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व स्वच्छता सारख्या मुलभूत सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीचे काय आढळून आले, त्याअनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (११-०७-२०२३) :** (१), (२) व (३ ) हे खरे नाही.

कृषी उत्पन्न बाजार समिती,पुणे यांनी उत्तम नगर हा दुय्यम बाजार घोषित केला आहे.
बाजाराच्या आवारात संरक्षक भिंत बांधून शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या संरक्षणाकरिता शेड उभारणी केली आहे.
तसेच इतर सोयी सुविधा तिथे उपलब्ध आहेत.

उत्तम नगर उपबाजार आवाराचा विकास आराखडा तयार केला असून पुणे महानगरपालिकेकडे मान्यतेसाठी पणन संचालक, पुणे यांच्याकडून सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई मधील एपीएमसी मार्केट मध्ये भरणाऱ्या अनधिकृत बाजारामुळे एपीएमसीचे सेसचे झालेले नुकसान**

**(९) ४५४९६ (२३-०९-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई मधील एपीएमसी मार्केटमध्ये गैरप्रकार सुरु असून, मार्केटमध्ये भरणाऱ्या अनधिकृत बाजारामुळे एपीएमसीचे लाखो रुपयांच्या सेसचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एपीएमसीच्या संचालकांनी व अधिकाऱ्यांनी वारंवार प्रयत्न करूनही सेसची होणारी चोरी रोखण्यात त्यांना अपयश आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बाजार व सेसची चोरी रोखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१२-०७-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
दिनांक ५/७/२०१६ रोजीच्या अध्यादेशानुसार बाजार आवाराबाहेर ३० फळे, ८ भाज्या व ४ मसाले नियमन मुक्त करण्यात आले आहेत त्यानुसार बाजार समितीकडून बाजार क्षेत्राबाहेर या वस्तूंचे नियमन केले जात नाही. तथापि शेतकरी व व्यापारी फळे, भाजीपाला व कांदा बटाटा थेट विक्रीसाठी बृहन्मुंबईत घेऊन जातात मात्र कोरोना काळातील लॉकडाऊनच्या कालावधीत बृहन्मुंबईत खाद्यान्ने, फळे व भाजीपाला यांचा तुटवडा होऊ नये हा उद्देश बाजार समितीचा व शासनाचा होता म्हणून कृषि उत्पादने थेट नेऊ दिले जात होते. तरी दि १०.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनधिकृत बाजार बंद करण्याच्या अनुषंगाने आढावा व अंमलबजावणी समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगाली शहरात बनावट ले-आऊटद्वारे शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(१०) ४६०७४ (२३-०९-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली शहरात बनावट ले-आऊटद्वारे तीन वेगवेगळया प्लॉट क्रमांकातील भागाचे तुकडे दर्शवून तसेच शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन त्यावर तीन हजार चौरस फुटाचे चार मजली बांधकाम केले जात असल्याची तक्रार मा.जिल्हाधिकारी व नगरपालिकेकडे स्थानिकांनी केली असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली शहरातील सर्व्हे क्र.९७, नारायण नगर, हिंगोली येथील प्लॉट क्र.१, २ व ५ आणि त्यांच्या भागाचे तुकडे दर्शवून ६४३.५० चौ.मी. चे सहा वेगवेगळे खरेदीखत करुन शासनाची फसवणूक करत मंजूर ले-आऊट पेक्षा जास्तीच्या जागेची खरेदी करुन शासकीय जागेवर अतिक्रमण केले आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, एका मजल्यासाठी अंदाजे तीन हजार चौ.फुट असे चार मजल्यावर बांधकाम होणार असून शासनाचे कोट्यावधी रुपयाचे नुकसान होणार आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, सहा खरेदीखतांची पडताळणी व एकत्रीकरण करुन नियमानुसार डी.पी.रोडला लागून दोन्ही बाजूंनी ४.५ मीटर जागा न सोडता डी.पी.रोडच्या जागेवर अतिक्रमण झाले आहे, हे ही खरे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) सदर प्रकरणी तज्ञ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करुन, या समितीद्वारे स्वयंस्पष्ट अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार असल्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी अहवाल सादर केला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबड नगरपालिका (ता.अंबड, जि.जालना) यांनी पाणीपुरवठा योजनेतील विज देयके व देखभाल खर्च वेळेत न भरल्याबाबत

**(११) ४८१९८ (२८-०९-२०२२). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबड (ता.अंबड, जि.जालना) नगरपालिकेने पाणीपुरवठा योजनेतील विज देयके व देखभाल खर्च वेळेत न भरल्याने शहरातील नागरिकांवर पाण्याचे संकट ओढवले असल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पाणीपुरवठा योजनेतील कर न भरल्यामुळे जालना नगरपालिका यांनी वारंवार निधीची मागणी तसेच अनेक स्मरणपत्रे अंबड पालिका प्रशासनाकडे दिली असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंबड नगरपालिका यांनी पाणीपुरवठा योजनेतील पाणीपट्टी संबंधित जलसंपदा विभागाला न देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अंबड शहरातील नागरिकांना भविष्यात सुरळीत पाणीपुरवठा होण्याकरीता संबंधित पालिका प्रशासनाने कोणत्या उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

अंबड जलशुद्धीकरण केंद्र पाणीपुरवठा योजनेचे सन २००६ ते मे, २०२२ अखेरपर्यंत विज बिले पूर्ण भरणा केली आहेत. त्यानुसार अंबड शहराचा विजपुरवठा खंडीत झालेला नसून, शहराचा पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(२) व (३) अंबड नगरपरिषदेस जालना नगरपरिषदेने दि.३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतची मागणी केलेल्या पाणीपट्टीचे एकूण बिल रक्कम रु.१०,१२,३३,१०७/- पैकी रु.४,४७,४०,०००/- इतका भरणा केलेला असून, उर्वरित रक्कम रु.५,६४,९३,१०७/- इतका भरणा करणे बाकी आहे. या व्यतिरिक्त जलसंपदा विभागाकडे अंबड नगरपरिषदेची थकबाकी नाही.
(४) अंबड शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही अंबड नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहरातील बंद असलेल्या पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीबाबत

**(१२) ५०२०२ (२०-०१-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी महानगरपालिका क्षेत्रातील पथदिवे बसविणे आणि त्याची देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी इइएसएल नावाच्या एजन्सीची सन २०१८ मध्ये शासनाने नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील जवळपास ७०० पेक्षाही जास्त पथदिवे बंद अवस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त शहरातील महापालिकेला पथदिव्यांचे दर महिन्याचे जवळपास १७ लाख रुपयांचे विद्युत देयक येत असतांही केवळ पथदिवे बंद असल्यामुळे शहरातील अनेक भागात नागरीकांना अंधारातून जावे लागत असल्यामुळे त्यांच्यात असुरक्षितता व भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी करुन तात्काळ परभणी शहरातील बंद असलेले पथदिवे बसविण्याबाबत व पथदिव्यांची देखभाल-दुरुस्ती नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे नाही.

Energy Efficiency Services Ltd समवेत दिनांक १०.८.२०१८ रोजी झालेल्या करारनाम्यानुसार आजपर्यंत शहरात एकूण १४९६१ पथदिवे बसविण्यात आलेले आहेत.

या पथदिव्यांची दुरुस्ती देखभाल करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत प्रभागनिहाय कर्मचारीमार्फत दररोज रात्री पाहणी

करुन दररोज सकाळी इइएसएलमार्फत नादुरुस्त पथदिव्यांची दुरुस्ती करुन घेण्यात येते.

इइएसएलमार्फत शहरातील पथदिवे वेळेवर बंद, चालू व नियंत्रण ठेवण्यासाठी CCMS (Centralise Controlling Monitoring System) प्रणाली बसविण्यात आली आहे. ज्यामुळे शहरातील सर्व पथदिवे बंद रहात नाही व बंद असलेल्या पथदिव्यांचा अहवाल ONLINE पहावयास मिळतो.

तसेच अपवादात्मक परिस्थितीत महावितरणाचा विद्युत पुरवठा खंडित होतो. त्यामुळे पथदिवे काही वेळे पुरता बंद राहतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील १९ शहरे राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानके पूर्ण करु शकत नसल्याबाबत**

**(१३) ५१४७७ (१९-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिसूक्ष्म धुळीकणांच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुमारे १९ शहरे राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानके पूर्ण करु शकत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हवेतील प्रदूषणात औद्यागिक आस्थापना आणि औष्णीक विद्युत प्रकल्पांबरोबरच धूळीचे वाढते प्रमाण देखिल जबाबदार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यातील वाढत्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सर्वसाधारणपणे हवेतील प्रदूषकांची पातळी पावसाळयात सर्वात कमी व हिवाळयात सर्वाधिक असते. पावसाळयात पावसाच्या पाण्याबरोबर मिसळल्याने व समुद्रावरुन येणाऱ्या वेगवान नैऋत्य मोसमी वाऱ्यामुळे हवेतील प्रदूषणाचा निचरा होतो. हिवाळयात हवेच्या कमी तापमानामुळे व वेगवान वाऱ्याच्या अभावाने जमिनीलगतची प्रदूषके ही उंचीवरील हवेत मिसळण्याचे प्रमाण कमी होते. त्यामुळे सततच्या तयार होणाऱ्या प्रदूषकांचा निचरा न झाल्याने हवेतील त्याचे प्रमाण वाढत जाते.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) प्रदूषित शहरांचे प्रदूषण रोखण्यासाठी व हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना राष्ट्रीय शुध्द हवा कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सर्वसमावेशक कृती आराखडा तयार केला असून त्याची अंमलबजावणी त्या त्या महानगरपालिकेकडून करण्यात येते आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### मुंबई उपनगरातील रिअर व्ह्यू आरशांच्या रिक्षांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) ५२३६२ (१९-०१-२०२३). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील नोकरी करणाऱ्या महिला प्रवाशांची रिक्षा चालकांकडून छेडछाड करण्याचे व विनयभंगाचे प्रकार वाढत असल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उपनगरातील रिक्षांमध्ये 'रिअर व्ह्यू' (मागचे पाहता येणारा) आरसा काढून टाकण्याबाबतचे निवेदन महिला प्रवासी संघटना व वॉचडॉग फाऊंडेशनने एका निवेदनाद्वारे वाहतूक पोलिस सहआयुक्त, पोलिस आयुक्त, मा. मुख्य सचिव आणि मा. मुख्यमंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्षांमधील रिअर व्ह्यू आरसा काढून टाकण्याबाबत मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत (आरटीओ) कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०७-२०२३) :** (१) दिनांक ११.११.२०२२ रोजी वृत्तपत्रांमध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) होय.

महिला प्रवासी संघटना व वॉचडॉग फाऊंडेशन यांचेकडून रिक्षांमध्ये रिअर व्ह्यू आरसा काढून टाकण्याबाबतचे निवेदन/तक्रार ई-मेलद्वारे प्राप्त झाले आहे.

(३) व (४) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२५(२) मधील तरतुदीनुसार तीन चाकी वाहनांना डाव्या व उजव्या बाजूस रिअर व्हयू आरसे बसविणे अनिवार्य आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील महामार्गावर होणाऱ्या अपघाती मृत्यूबाबत

**(१५) ५२५११ (२२-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महामार्गावर होणाऱ्या अपघाती मृत्यूमुळे पुन्हा एकदा वेगाचा मुद्दा चर्चेत आला असून, वाहनांची र्निमिती करणाऱ्या कंपन्यामार्फत वाहनांची वेगमर्यादा जास्त ठेवली जाणे हे अपघात होण्यास कारणीभूत ठरत असल्याचे बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गावर गाडी चालविताना वेग प्रति तास ११० किलोमिटर पेक्षा अधिक वाढविणे हे कायद्याने गुन्हा असतांनाही २५० प्रति किलोमिटर वेग मर्यादा ठेवणाऱ्या अलिशान गाड्या बनविणाऱ्या कंपन्यांवर परिवहन विभागमार्फत कोणतीच कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त प्रकरणी सदर कंपन्यांना परिवहन विभाग व पोलिस विभागामार्फत विचारणा केली असता त्यांना सदर कंपन्यांकडून पुरेशी माहिती देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने सदर धोकादायक वाहनांची निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढणाऱ्या स्पर्धाना आळा घालण्यासाठी सर्वच गाड्याच्या वेगमर्यादेवर नियंत्रण ठेवण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेवून त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०७-२०२३) :** (१) दि.१७.०९.२०२२ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झाली आहे.

(२), (३) व (४) वाहनांच्या निर्मितीवर बंधन घालण्याचे अधिकार राज्य शासनास नसून यासंदर्भातील नियमन केंद्र शासनाकडून होते. या संदर्भात केंद्रीय मोटार वाहन नियम,१९८९ नियम १२६ मध्ये विहित केलेल्या तपासणी संस्थेने प्रमाणित केलेल्या वाहनांची नोंदणी मोटार वाहन कायद्यानुसार केली जाते.

वेगमर्यादेपेक्षा अधिक वेग वाढविणे हे कायद्याने गुन्हा असतांनाही अधिक वेग मर्यादा ठेवणाऱ्या अलिशान गाड्या बनविणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत उद्योग विभागास व परिवहन आयुक्त कार्यालयास दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग, मंत्रालयाची अधिसूचना एस.ओ.१५२२(ई) दि.०६.०४.२०१८ नुसार रस्त्यांची परिस्थिती व वाहनांच्या प्रकारानुसार विविध रस्त्यांवर वाहनांची वेगमर्यादा निश्चित केली आहे.

तसेच दि.१५.०४.२०१५ व ०१.०५.२०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार केंद्रीय मोटार वाहन नियम,१९८९ च्या नियम ११८ मध्ये विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे परिवहन संवर्गातील वाहनांना वेगनियंत्रक बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्यात वारकऱ्याचे श्रध्दास्थान असलेल्या पंढरपूर येथे कॉरिडॉर तयार करण्याबाबत

**(१६) ५३९०० (२४-०१-२०२३). श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ कॉरिडॉर आणि मध्ये प्रदेशातील उज्जैन येथे महाकाल कॉरिडॉर प्रकल्पाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात वारकऱ्यांसाठी वारकऱ्याचे श्रध्दास्थान असलेल्या पंढरपूर येथे भव्य कॉरिडॉर तयार करण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्यात ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून अशा सूचना नगरपरिषदेस प्राप्त नाहीत.

तथापि, पंढरपूर जि.सोलापूर येथे मंदिराजवळ कॉरिडॉर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) होय, हे खरे आहे.

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या जन्म चतुशताब्दी वर्षानिमित्त शासनामार्फत दि.२ जून, २००९ रोजी पंढरपूर व पालखी मार्ग विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली होती. सदर मंजूर विकास आराखड्यात पंढरपूर शहरातील व शहराकडे येणारे रस्ते, पुल, घाट, शौचालये, ६५ एकर क्षेत्र, पालखीतळ विकास इ. पायाभूत सुविधाच्या कामांचा समावेश होता. सदर आराखड्यानुसार पंढरपूर तीर्थक्षेत्रासाठी एकूण १०० कामे मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी ३२ कामे रद्द करण्यात आलेली असून उर्वरित कामापैकी ५१ कामे पूर्ण झाली असून ०६ कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित कामे अद्याप सुरू झालेली नाहीत. सदर आराखड्यास एकूण ३११.६८ कोटी इतका निधी प्राप्त असून त्यापैकी २९२ कोटी

इतका निधी खर्च झाला आहे.

(३) पंढरपूर येथे भाविकांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता भाविकांना चांगल्या प्रकारे पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी व पंढरपूर शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पंढरपूर येथे मंदिर व परिसर विकास व सुशोभिकरण दर्शन बारी सुधारणा, रस्तेविकास, पार्किंग व्यवस्था, उद्यान विकास सुधारणा, घाट बांधकाम, शौचालय व्यवस्था, विद्युत व्यवस्था सुधारणा, पाणी पुरवठा व मलनिसारण व्यवस्था वाढ व सुधारणा इ. कामे प्रस्तावित असून सदर कामी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत गर्दी व्यवस्थापन मंदिर परिसराचा विकास आणि त्यास भव्य स्वरुप देण्यासाठी वाराणसीच्या धर्तीवर पंढरपूर शहरात कॉरिडॉरची निर्मिती तसेच इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

यात्रा कालावधीत श्रींच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात लाखो भाविक येत असतात. अशावेळी आपत्कालीन व्यवस्थापन आणि गर्दी व्यवस्थापन करणे ही अत्यंत आवाहानात्मक परिस्थिती बनते. पोलीस प्रशासनाला एकेरी मार्ग सारख्या गोष्टींद्वारे गर्दीचे व्यवस्थापन करणे अशक्य होते. त्यामुळे गर्दीतून चेंगराचेंगरी होऊन एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मंदिर परिसरातील भागात काशी विश्वनाथ, उज्जैनच्या धर्तीवर कॉरिडॉरचा नियोजित प्रारुप आराखडा प्रस्तावित आहे.

(४) पंढरपूरचा विकास करणेसाठी कॉरिडॉर प्रकल्प उभारताना कमीत कमी ऐतिहासिक वास्तू आणि मंदिरे बाधित होतील याचे नियोजन प्रस्तावित असून आराखडा अंतिम करताना या बाबीचा विचार करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू तालुक्यात औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांमुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१७) ५३९१२ (१९-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यात विशेष मालवाहू रेल्वे मार्गिका, मुंबई -बडोदा सुपर एक्सप्रेस वे यासह अनेक प्रकल्प सुरू असून थर्मल पॉवर स्टेशन, औद्योगिक उपक्रमही सुरु असल्यामुळे हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होत असल्याचा निष्कर्ष तालुका एन्व्हायर्नमेंट वेल्फेअर असोसिएशनकडून, हेल्दी एनर्जी इनिशिएटिव्ह इंडिया यांच्या माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रदूषणाचे प्रमाण सातत्याने वाढत राहिले तर सिलिका धुलिकणाच्या घातक पातळीच्या संयोगाने, या भागातील नागरिकांच्या श्वसन आणि हृदय व रक्तवाहिन्यांवर वाईट परिणाम होत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत डहाणू तालुक्यातील प्रदूषण कमी करण्याकरिता प्रशासन पातळीवर कोणत्या उपाययोजना राबवण्यात येणार आहेत वा केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे. हेल्दी एनर्जी इनिशिएटीव्ह (इंडिया) या खाजगी संस्थेचा अहवल / निष्कर्ष माहे जून २०२२ मध्ये निदर्शनास आले.

(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, पालघर यांच्या दि. ०५.१२.२०२२ रोजीच्या अहवालानुसार हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुकूटबन (ता.झरीजामण,जि.यवतमाळ) येथील सिमेंट कंपनीतून निघणाया धुळीमुळे शेतातील पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(१८) ५५३०८ (२३-०१-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुकूटबन (ता.झरीजामण,जि.यवतमाळ) येथील सिमेंट कंपनीतून निघणाऱ्या धुळीमुळे शेतातील पिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) मे. आर.सी.सी.पी.एल. प्रा.लि. च्या धुळीमुळे लगतच्या शेतातील पिकांचे नूकसान झाल्याबाबतची तक्रार या कार्यालयास दि. २०/१०/२०२२ रोजी व त्या सुमारास प्राप्त झालेली नाही.

तहसिलदार, झरीजामणी, जि. यवतमाळ व जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ यांच्याकडून अनुक्रमे दि. १४/१२/२०२२ व दि. १५/१२/२०२२ रोजीच्या प्राप्त अहवालानूसार पाहणीदरम्यान आढळलेल्या बाधित शेतजमीनीच्या नूकसान भरपाईच्या अनुषंगाने तहसिलदार, झरीजामणी यांच्या कार्यालयाकडून दि. ०९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये व्यवस्थापक, मे. आर.सी.सी.पी.एल. प्रा.लि. मुकुटबन यांना कळविण्यात आलेले आहे.

(२) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या दि. २२/११/२०२२ रोजीच्या संदेशानूसार कृषी सहाय्यक, मंडळ अधिकारी व तलाठी मुकुटबन यांनी दि. २८/११/२०२२ व दि. २९/११/२०२२ रोजी तक्रारकर्ते शेतकऱ्यासमवेत शेताची पाहणी केली. पाहणीदरम्यान मुकुटबन शेत शिवारातील शेतकरी संख्या एकूण ३० असून क्षेत्रफळ २८.२५ हे.आर बाधित आढळून आलेले आहे. तसेच मौजा अडेगांव शिवारातील दोन शेतकरी क्षेत्र २.४५ हे.आर. बाधित आढळून आलेले आहेत. बाधित शेतजमीनीच्या नुकसान भरपाईच्या अनुषंगाने तहसिलदार, झरीजामणी यांच्या कार्यालयाकडून दि. ०९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये व्यवस्थापक, मे. आर.सी.सी.पी.एल. प्रा.लि. मुकुटबन यांना कळविण्यात आलेले आहे. त्यास अनुसरुन मे. आर.सी.सी.पी.एल. प्रा.लि. यांनी त्यांच्या दि. १६.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये नुकसान भरपाईबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ जो निर्णय घेतील त्याचे पालन करण्यास कटीबध्द असल्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. १२/१२/२०२० रोजी भेट दिली असता पाहणीदरम्यान सिमेंट उद्योग मागील २० दिवसांपासून बाजारात मागणी कमी असल्यामुळे बंद होता. तसेच चुनखडी खाण सुद्धा मागील १४ दिवसांपासून बंद होती. तसेच खाण परिसरातील सर्ज हॉपरला ताडपत्रीने आच्छादित केलेले असल्याचे तसेच लगतच्या शेतातील पिकांवर, झाडांवर कोणत्याही प्रकारची धूळ साचलेली नसल्याचे निदर्शनास आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचगणी व पाटण (जि.सातारा) भागाच्या संवर्धनाबाबत**

**(१९) ५६५१२ (०९-०५-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचगणी (जि.सातारा) भागात उत्तर प्रदेशातील जोशीमठा प्रमाणेच भूस्खलनाचा धोका असल्याचा भुगर्भशास्त्रज्ञांचा अंदाज असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाटण (जि.सातारा) येथे दरड कोसळण्याच्या घटना लक्षात घेता शासनाने त्याभागाचा तज्ञांच्या मदतीने सर्वेक्षण करण्यासंदर्भात माहे ऑगस्ट, २०२२ वा त्या दरम्यान घोषणा केली होती, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, पाचगणी, पाटण भागातील संभाव्य धोका टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली याबाबत उपाययोजना करत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१८-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

दि. १४.१०.२०२२ च्या शासन निर्णयान्वये संभाव्य दरडग्रस्तांचे तात्पुरते तसेच कायमस्वरुपी पुनर्वसन करण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच पाटण तालुक्यात संबंधित गावातील बाधित कुटुंबांचे सुरक्षिततेच्या कारणास्तव तात्पुरते

स्थलांतर शासनाच्या शेडमध्ये केले आहे. तसेच सातारा जिल्हयातील दरडप्रवण भागातील नागरिकांचे दरड कोसळणे बाबतची भिती कमी होणेकामी गावस्तरावर आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत प्रशिक्षण व जनजागृती मोहिम राबविणेत आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपळगाव बसवंत (जि.नाशिक) ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर करणेबाबत

**(२०) ५६५३७ (२४-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि.नाशिक) या ग्रामपंचायतीची लोकसंख्या ६५ हजारांच्या जवळपास असल्याने या ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर करण्यात यावे अशी मागणी येथील नागरीकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर करणेबाबतची शासन अधिसूचना (उदघोषणा) दिनांक २२/०३/२००७ रोजी शासनाने प्रसिद्ध केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपावेतो शासनाने या ग्रामपंचायतीस सन २००७ पासून नगरपरिषदेचा दर्जा दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त ग्रामपंचायतीस नगरपरिषदेचा दर्जा देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) हे खरे आहे,

तथापि, सदर उद्‌घोषणेस बराच कालावधी उलटून गेला असल्याने, सदर उद्‌घोषणा रद्द करुन नव्याने प्राथमिक उद्‌घोषणा निर्गमित करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

दरम्यान, सदर प्रकरणी राज्य निवडणूक आयोगाचे अभिप्राय मागविले असता, राज्य निवडणूक आयोगाच्या दि.०९ नोव्हेंबर, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या निवडणूक कार्यक्रमाअंतर्गत नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव-बसवंत ग्रामपंचायतींचे निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, दि.१८ नोव्हेंबर, २०२२ रोजी निवडणूक नोटीस देखील प्रसिद्ध झालेली आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव-बसवंत ग्रामपंचायतींची निवडणूक स्थगित करणे शक्य नाही, असे राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या दि.२४ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

---

## ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) या नगरपरिषदेस महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याबाबत

**(२१) ५६६६६ (२४-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओझर मिग (ता.निफाड, जि.नाशिक) या नगरपरिषदेस महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओझर मिग या गावास नुकताच शासनाने नगरपरिषदेचा दर्जा प्रदान केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शहरास दर मानसी १३५ लिटर याप्रमाणे पाणीपुरवठा करण्याचे शासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या धोरणाप्रमाणे तसेच येथील लोकसंख्या व शहरास होणारा अपुरा पाणीपुरवठा लक्षात घेता नवीन पाणी पुरवठा योजनेस उक्त योजनेंतर्गत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०७-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) ओझर या गावास दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी नगरपरिषदेचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

ओझर नगरपरिषदेमार्फत नवीन पाणीपुरवठा प्रकल्प प्रस्तावित करण्याच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही सुरु असून सदर प्रकल्पाचा प्रस्ताव विहित मार्गाने शासनास प्राप्त झाल्यानंतर केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत सदर प्रकल्प विचारात घेण्यात येईल.

---

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचे काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(२२) ५६८९९ (२४-०४-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचे कामातील अनेक टप्पे अद्याप पूर्ण झालेले नसल्यामुळे या विमानतळावरून विमानाचे पहिले प्रवासी उड्डाण घेण्यासाठी सन २०२५ पर्यंत विलंब होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमानतळाच्या कामामधील उलवे नदीचा प्रवाह बदलणे, उच्च दाब विजवाहिन्या बदलणे, उलवे टेकडीच्या खोदकामाची आणि जमिनीच्या सपाटीकरणाची इत्यादी कामे गतीने पूर्ण करून घेण्याकरिता विमानतळाचे काम देण्यात आलेल्या अदाणी एंटरप्राइजेस लिमिटेड, लार्सन अँड टूर्बो कन्स्ट्रक्शन आणि इंग्लंड मधील जहा हदिद आर्किटेकट्स या कंपन्यांकडून समन्वय साधून सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करून घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, सन २०११ मध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पास परवानगी देतेवेळी केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने विमानतळा भोवतालच्या प्रदेशाचा नियोजनबद्ध विकास व्हावा अशी अट घातली असताना या संदर्भात सिडकोच्या प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) विमानतळ पूर्व-विकास कामे जसे की उलवे नदीचा प्रवाह बदलणे, उच्च दाब वीजवाहिन्या बदलणे, उलवे टेकडीच्या खोदकामाची आणि जमिनीच्या ५.५ मी. पर्यंतची सपाटीकरणाची कामे सिडकोद्वारे पूर्ण करण्यात आली आहेत.

सवलतधारक (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि.) मे.एल ॲन्ड टी ची EPC कंत्राटदार म्हणून नियुक्ती केली आहे आणि सर्व कामे नियोजनाप्रमाणे प्रगतीपथावर असून ३० डिसेंबर, २०२४ रोजी विमानतळाचा टप्पा १ आणि टप्पा २ कार्यान्वयीत होणे अपेक्षित आहे.

(३) पर्यावरण मंत्रालयाच्या अटींचे पालन करुन शासनाच्या दि.१०.१.२०२३ च्या अधिसूचनेद्वारे नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) अधिसूचित केले असून महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(b) अन्वये अधिसूचित क्षेत्रासाठी 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून सिडकोची नियुक्ती केली आहे. या अधिसूचनेमध्ये नैना प्रकल्पांतर्गत उरण, पनवेल, कर्जत, खालापूर आणि मधील एकूण २७० महसुली गावांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुके आणि ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुका आणि नैनाचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे ५५,७९२ हे. (५५८ चौ.किमी) आहे.

नंतर काही क्षेत्रांसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची 'विशेष नियोजन प्राधिकरण' म्हणून नियुक्ती केल्यापासून हे क्षेत्र ३७१ चौ.किमी. झाले आहे. नैना क्षेत्रामध्ये १२ नगर रचना परियोजना (Town Planning Schemes) तयार करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील बीएमटीसी कर्मचाऱ्यांना व त्यांच्या वारसांना दुकानाचे गाळे किंवा भूखंडाचे वाटप करण्याबाबत

**(२३) ५६९५२ (२४-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणेश नाईक (ऐरोली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सिडको महामंडळाची स्थापना करून विविध पायाभूत सुविधांची पूर्तता करताना सिडकोने मुंबईतील बेस्टच्या धर्तीवर नवी मुंबई बीएमटीसी या नावाने स्वतंत्र परिवहन सेवेचा शुभारंभ केला परंतु विविध कारणामुळे ही सेवा १९८४ मध्ये बंद केली त्यामुळे जवळपास १६०० कर्मचाऱ्यांवर बेरोजगाराची कुऱ्हाड कोसळली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीएमटीसी सेवा बंद करताना त्यातील प्रत्येक कामगारांचे पुनर्वसन करण्याचे आश्वासन सिडकोच्या तत्कालीन व्यवस्थापनाने देऊनही अद्याप या कामगाराच्या समस्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीएमटीसी कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांच्या पुनर्वसनाच्या एक भाग म्हणून निधी तसेच इतर कायदेशीर देणे संबंधित कर्मचाऱ्यांना अदा करण्याचे निर्देश दिनांक १३ जुलै, २०१३ रोजी तत्कालीन शासनाने देऊनही अद्याप कार्यवाही पूर्ण करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच बीएमटीसी कामगार किंवा त्यांच्या वारसांना सिडकोने नवी मुंबईमध्ये १०० चौरस फूट आकाराचे दुकानाचे गाळे किंवा भूखंडाचे वाटप करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बीएमटीसी कर्मचाऱ्यांना व त्यांच्या वारसांच्या चाळीस वर्षापासूनच्या प्रलंबित सर्व मागण्या तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सिडको महामंडळाच्या स्तरावरील त्रिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार सर्वेक्षणाअंती माजी BMTC पात्र कर्मचा-यांना पुनर्वसन योजनेंतर्गत १०X१० चौ.फुटांच्या गाळयांच्या वाटपाबाबत सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१०८४०, दि.२७.६.२०१३, दि.१०.७.२०१३ च्या ठरावास शासन मान्यता दि.९.९.२०१४ रोजी देण्यात आलेली आहे.

(४) हे खरे आहे.

(५) BMTC कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने उचित निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीराम एज्युकेशन सोसायटी ( जि.बुलढाणा) संचालित निवासी मूकबधीर विद्यालय खामगांव यांना अनुदान मिळणेबाबत

**(२४) ५७२०१ (२६-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीराम एज्युकेशन सोसायटीव्दारा संचालित निवासी मूकबधीर विद्यालय खामगांव, (जि.बुलढाणा) येथील विद्यालयातील इयत्ता ८ वी ते १० वीच्या वाढीव विद्यार्थी संख्येस अनुदान तत्वावर मान्यता मिळणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधीनी पत्राव्दारे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्था सन १९८५ पासून कार्यरत असून मूकबधीर विद्यार्थ्यांसाठी बालवर्ग ते इयत्ता १० वी पर्यंतचे कर्णबधीर शिक्षण देणारी जळगाव, खामगाव, अकोला, वाशिम व बुलढाणा या चार जिल्हयातील एकमेव संस्था असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वाढीव विद्यार्थी संख्येस अनुदान व शाळा संहितेप्रमाणे कमर्चारी पदास मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) श्रीराम एज्युकेशन सोसायटी, खामगांव संचलित मूकबधीर विद्यालय, खामगांव, जि.बुलढाणा या विनाअनुदानित शाळेतील इ.८ वी ते १० वी च्या वाढीव २५ विद्यार्थी संख्येस अनुदान तत्वावर मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबतची माहिती शासन पत्र दि.२८.०४.२०२३ अन्वये आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडून मागविण्यात आली असून सदरची माहिती शासनास अद्याप अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल - उरण (जि.रायगड) तालुक्यातील सिडको हद्दीतील झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२५) ५७२२४ (२४-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल-उरण (जि.रायगड) तालुक्यातील सिडको हद्दीतील जवळपास ३०-४० वर्षापासून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीवासियांच्या झोपडया कायमस्वरूपी करण्याबाबत निश्चित धोरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि. यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वांसाठी घरे उपलब्ध करून देण्याचे स्वप्न असताना गेल्या ३०-४० वर्षापासून झोपडपट्टीत वास्तव्य करित असलेल्या नागरिकांचे योग्य ते पुनर्वसन अथवा पर्यायी जागा न देता सिडको प्रशासन झोपडया अनधिकृत ठरवून नागरिकांना बेघर करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल-उरण तालुक्यातील सिडको हद्दीतील गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्य करित असलेल्या झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसनाबाबत निश्चित धोरण आखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
नवी मुंबई क्षेत्रातील जमिनी नवनगर प्रकल्पाच्या विकासासाठी आवश्यक असल्याने सिडकोच्या हद्दीतील बेकायदेशीर / अनधिकृत झोपड्यांना तथा बांधकामधारकांना सिडकोमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार नोटीसा देऊन सिडकोमार्फत कारवाई करण्यात येते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महात्मा ज्योतिबा फुले चित्रपट निर्मितीच्या समितीच्या कामकाजाबाबत

**(२६) ५७२७० (२६-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपट निर्माण करण्यासाठी झालेला करार करोनाच्या पार्श्वभूमीवर चित्रपटाच्या चित्रीकरणावर बंदी असल्याने कालबाह्य झाल्याने नव्याने करारनामा करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, महासंचालनालय व चित्रपट निर्मिती संस्था यांच्यामध्ये झालेल्या करारावर तत्कालीन संचालक (माहिती) (प्रशासन) यांनी संचालक या नात्याने स्वाक्षरी केली असून करार केलेली महासंचालनालयाची नस्ती गहाळ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९५९ च्या नियम ८ अंतर्गत चौकशीचे आदेश दिले असून त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :**(१) महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपट निर्मिती करण्याकरिता करण्यात आलेला करार कालबाह्य झाल्याने मे.इलोक्योन्स मिडिया प्रा.लि.या संस्थेसोबत सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. मावज-२०२०/प्र.क्र.५७/का.३४,

दि.१४.९.२०२२ नुसार दि.१०.१०.२०२२ रोजी पुरवणी करारनामा करण्यात आला आहे.

(२) चित्रपट निर्मिती संस्थेसोबत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सन २०१८ मध्ये केलेल्या मूळ करारनाम्याची नस्ती गहाळ झाली आहे.

त्याबाबत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने पोलीस ठाण्यामधे एफ.आय.आर नोंदविला आहे.

(३) यासंदर्भात विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) यासंदर्भात विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(५) यासंदर्भात विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

---

### नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती ) येथे अण्णा भाऊ साठे महामंडळातर्फे मांतग समाजासाठी कर्ज वितरणाचे उद्दीष्ट वाढविण्याबाबत

**(२७) ५७३४२ (२६-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथे अण्णा भाऊ साठे महामंडळातर्फे मांतग समाजासाठी केवळ ३५ नागरिकांनाच कर्ज वितरण करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अण्णा भाऊ साठे महामंडळातर्फे मांतग समाजाकडून कर्ज वितरणाचे उद्दीष्ट वाढविण्याबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१)हे खरे नाही. शासन निर्णय क्र.एलएएस-२०२२/प्र.क्र.९४/ महामंडळे, दिनांक ४.११.२०२२ अन्वये थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रु.२५०००/- वरुन रु.१०००००/- पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यास अनुसरुन महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीच्या प्रमाणात ३४ जिल्हयांना निधीचे वितरण करता यावे. या धोरणानुसार महामंडळामार्फत सन २०२२-२३ या वर्षाकरीता १२०७ भौतिक व रु.१०.२६ कोटी निधी वाटपाचे उद्दिष्ट निश्चित करुन सदर उद्दिष्ट सर्व जिल्हा कार्यालयांना विभागून देण्यात आले आहे.त्यामध्ये जिल्हा कार्यालय, अमरावती यांना ३५ लाभार्थींचे भौतिक उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, महामंडळाने सन २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षाकरीता थेट कर्ज योजनेचे १६५० भौतिक व रु.१४.०२ कोटी आर्थिक उद्दिष्ट निश्चित केले असून सदर उद्दिष्ट सर्व जिल्हा कार्यालयांना विभागून देण्यात आले असून मागील उद्दिष्टांपेक्षा जिल्हा कार्यालय, अमरावती यांना उद्दिष्ट वाढवून ५० लाभार्थींचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील कोव्हीड विषाणुजन्य आजारामुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसदारांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(२८) ५७४६६ (२४-०४-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोव्हीड-१९ या विषाणूजन्य आजारामुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकास सानुग्रह अनुदान म्हणून ५० हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार सानुग्रह अनुदान मिळण्यासाठी संगणकीय प्रणालीव्दारे अहमदनगर जिल्ह्यातील एकूण किती अर्ज शासनास सादर करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, यापैकी किती वारसदारांना सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे व किती वारसदारांचे अर्ज प्रलंबित आहेत व त्यांना एकूण किती अनुदान देय आहे,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील पात्र वारसदारांना प्रलंबित अनुदान तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हील) क्र.५३९/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र.११२०/२०२१ मध्ये दि.४.१०.२०२१ रोजी दिलेल्या आदेशान्वये कोव्हिड-१९ या विषाणूजन्य आजारामुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या नातेवाईकास रू.५०,०००/-इतके सानुग्रह सहाय्य देण्याबाबत शासन निर्णय दि.२६.११.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला.

(२) सदर शासन निर्णयानुसार सानुग्रह अनुदान मिळण्यासाठी संगणकीय प्रणालीव्दारे एकूण १७२८४ अर्ज प्राप्त झाले आहेत.

(३) एकुण १३२८४ मृत व्यक्तींच्या नजीकच्या नातेवाईकास सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे, ५६ अर्ज निर्णयासाठी प्रलंबित आहेत. मृत व्यक्तींच्या नजीकच्या नातेवाईकास एकूण रुपये ६६४२.०० लक्ष एवढे अनुदान अदा करण्यात आले आहे.

(४) प्रलंबित अर्ज लवकरात लवकर निकाली काढण्याच्या सूचना वेळोवेळी संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत. पात्र अर्जदारांना सानुग्रह सहाय्य प्रदान करण्यात आले आहे.मात्र ७७३ इतक्या अर्जदारांचे बँक तपशील बरोबर नसल्याने त्यांचे प्रदान बँकेने नाकारले आहे. यास्तव या अर्जदारांचे बँक खाते तपशील अद्ययावत करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील १८७ पूरग्रस्त कुटुंबियांचे पुनर्वसन मौजे आंबवन येथे करण्याबाबत

**(२९) ५८१५४ (२४-०४-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील १८७ पूरग्रस्त कुटुंबियांचे पुनर्वसन मौजे आंबवन येथे करण्याबाबत मदत व पुनर्वसन मंत्री महोदयांनी माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने पुनर्वसन विभागाने १८७ पैकी केवळ ९९ कुटुंबियांचेच पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वस्तुस्थिती पाहता जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांनी शासनाकडे पाठवलेल्या प्रस्तावामध्ये १८७ बाधीत पूरग्रस्त कुटुंब असल्याचे नमूद केले असतांनाही पुनर्वसन विभागाने केवळ ९९ कुटुंबियांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव तयार करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन पूरग्रस्त बाधीत ९९ कुटुंबाऐवजी १८७ कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) वाढीव कुटुंबे विचारात घेता २६६ कुटुंबाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने तयार केला आहे

(४) हे खरे आहे.

(५) शासन मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) शहराच्या हद्दवाढ प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत

**(३०) ५८१५९ (०७-०६-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि. बीड) शहराच्या हद्दवाढीबाबत १ ते १७ मुद्याबाबत आवश्यक कागदपत्रासह अहवाल सादर करण्याबाबत शासनाने जिल्हाधिकारी, बीड यांना दिनांक ६ डिसेंबर, २०२२ रोजी ०५ स्मरणपत्र दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई शहराची झपाट्याने वाढ होत असल्याने नागरिकांना मुलभूत सुविधेपासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे तातडीने मुद्देनिहाय आवश्यक कागदपत्रासह अहवाल शासनास सादर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे दि. २९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हद्दवाढीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अंबाजोगाई नगरपरिषदेच्या हद्दवाढीसंदर्भातील कार्यवाही जिल्हाधिकारी, बीड यांच्यास्तरावर सुरु असून, सदर प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयुक्त जळगाव मनपा यांनी जळगाव शहर पोलीस स्टेशनने दिलेल्या पत्रानुसार चौकशी करून गुन्हा दाखल होणेबाबत

**(३१) ५८८४२ (०९-०५-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहर पोलीस स्टेशनकडून महानगरपालिका जळगांव यांना दिनांक २७ ऑगस्ट, २०२० रोजी पत्र क्रमांक २११९/२०२० देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रात शेतकरी महिलेच्या मृत्युच्या पोलिसांकडील चौकशी प्रकरणात मनपा विधी समितीचे तत्कालीन स्वीकृत सदस्य श्री.सोनी यांनी हस्तक्षेप केल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच सदर पत्रान्वये जळगांव शहर पोलीस स्टेशन यांनी आयुक्त, जळगांव मनपा यांचेकडून एकूण १३ मुद्यांची माहिती व कागदपत्रे यांची मागणी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पत्रान्वये मनपा आयुक्त यांना गंभीर स्वरूपाची तक्रार असल्याने गुन्ह्याचा प्रकार आढळून आल्यास पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करावी असे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(५) त्यानुषंगाने महानगरपालिकेने श्री.सोनी यांच्या विरुध्द पोलिसांकडे तक्रार केली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, आयुक्त, महानगरपालिका यांच्याकडे पोलिसांनी मागणी केलेले १३ मुद्द्यांची माहिती व कागदपत्रे सादर केली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पोलिस निरिक्षक शहर पोलीस स्टेशन यांचेकडील पत्र दि.२७.०८.२०२० मध्ये "अर्जदार अक्षय शैलेंद्र बियाणी, रा.मुंदडा नगर जळगाव यांनी जळगाव शहर महानगरपालिका जळगाव येथील विधी समिती स्विकृत सदस्य धिरज रामचंद्र सोनी यांचे विरुध्द दिलेला तक्रार अर्ज इकडील पोलिस स्टेशनला असलेल्या चौकशी प्रकरणात हस्तक्षेप करुन परस्पर खोटे व्यवहार केले असल्याने व पोलिस अधिका-यांची भेट घेवून दिशाभूल केली म्हणून त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत नमूद आहे" असे पत्रामध्ये नमूद केलेले आहे.

(३), (४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

(७) तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक २६.१२.२०१९ अन्वये यापूर्वीच जिल्हा पोलीस अधिक्षक यांना पत्रान्वये जळगाव पोलीस विभागाकडील, शहर पोलीस ठाणे जळगाव यांचेकडेस दाखल असलेले सर्व तक्रारी अर्ज निकाली काढण्यात यावे असे पत्र देण्यात आलेले होते. सदरची परिस्थिती कायम असल्याने पुढील कार्यवाही करणेत आलेली नाही.

---

## जळगाव मनपाचे तत्कालीन विधी समिती सदस्य यांनी विना परवानगी बांधकाम केल्याबाबत

**(३२) ५८८४४ (१०-०५-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील नवी पेठेतील सिटी सर्वे नं.२०९२ ही जागा जळगाव मनपाचे तत्कालीन विधी समिती सदस्य श्री.धिरज सोनी यांचे वडिलांचे मालकीचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेतील दक्षिणेकडील भागात विनापरवानगी बांधकाम सुरु असतांना जळगाव महानगरपालिकेने श्री.सोनी यांना दिनांक ४ जुलै, २०१९ रोजी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बेकायदेशीर बांधकामाबाबत महानगरपालिकेने कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणच्या बेकायदेशीर बांधकामाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जळगाव शहर महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष जागेवर पहाणी करून लोखंडी खिडक्या व लोखंडी गेट, बांधकामास प्लास्टर चे काम सुरु असल्याचे दिसून आल्याने पत्र क्र.७७३, दि.०४/०७/२०१९ देण्यात आले आहे.

(३) व (४) महानगरपालिकेच्या स्तरावर तपासणी केली. यांस दक्षिणेकडील भागात बांधकाम परवानगी क्र.०४५५. दि. २३/०८/२००८ अन्वये देण्यात आलेली आहे. तसेच पत्र क्र.९६,दि.१३/०३/२००९ अन्वये भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. तसेच उत्तरेकडील भागात बांधकाम परवानगी क्र.३८२, दि.१७/०५/२०१६ व पत्र क्र. ६८०, दि.०५/१२/२०१६ अन्वये भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचे बांधकाम बेकायदेशीर नाही. प्रत्यक्ष जागेवर लोखंडी खिडक्या, गेट बसविणे, टॉइल्स लावणे, रंगरंगोटी करणे ही कामे सुरु होती. ज्यास बांधकाम परवानगीची आवश्यकता नाही. त्यामुळे तक्रारदार श्री. अक्षय बियाणी यांचा अर्ज निकाली काढल्याचे दि. २९/०६/२०२१ पत्र क्र. २७६ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांतील प्राचार्यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(३३) ५८९४७ (२६-०४-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४० अशासकीय अनुदानित समाजकार्य महाविद्यालयांतील प्राचार्यांच्या रिक्त जागा भरण्यास राज्य शासनाने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली होती व त्यानुसार विविध संस्थांनी भरती प्रक्रिया सुरू केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षण धोरणाला डावलून प्राचार्यांची रिक्त पदे भरली जात असल्याचा आक्षेप घेत समाजकल्याण आयुक्त यांनी सर्व विद्यापीठांना पत्र पाठवून ही भरती प्रक्रिया थांबवली असून रिक्त असलेली प्राचार्यांची पदे भरण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार रिक्त असलेली प्राचार्यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) निरंक.

---

### तळीये (ता.महाड, जि.रायगड) गावातील कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३४) ५९२८५ (२४-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे**

**(राजूरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळीये (ता.महाड, जि.रायगड) दरडग्रस्त गावाचे पुनर्वसन दोन वर्षे होवूनसुध्दा अद्यापही झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागात दरडखाली नष्ट झालेल्या ६६ व उर्वरीत कुटूंबे मिळून जवळपास एकूण २७१ कुटूंबांसाठी घरे उभारली जाणार असून प्रत्येक कुटूंबाला ६२३ चौ.फुटाची घरे दिली जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित ठेकेदारांकडून दरडग्रस्तांसाठी घरे उभारण्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्यामुळे जवळपास २५ कुटूंबांना कंटेनरमध्ये रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यासह उक्त दरडग्रस्त कुटूंबांना तातडीने घरे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (१८-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

२७१ कुटूंबांपैकी ६६ नागरीकांना प्लॉटचे लॉटरी पद्धतीने वाटप करण्यात आले आहे. प्रत्येक कुटूंबाला ६०० चौ. फुटांची घरे दिली जाणार आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्या दि.१२.०७.२०२३ च्या प्राप्त अहवालानुसार नमूद करण्यात येते की,

१) सदर पुनर्वसन क्षेत्र हे उंचावर असल्यामुळे व घाटरस्ता असल्यामुळे बांधकाम साहित्य, पाणी, घराकरीता कारखान्यातून येणारे साहित्य उतरवून परत चढवावे लागत आहे त्यामुळे वेळेचा अपव्यय होत आहे.

२) डोंगराळ भाग असल्यामुळे व भात शेती करत असल्यामुळे सदर घराच्या बांधकामास पावसामुळे नोव्हेंबर २०२२ नंतरच वेग आला आहे.

३) उन्हाळयात काम चालू असल्यामुळे उन्हामुळे सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत लोखंडी स्वरुपाचे काम करणे कठीण आहे.

४) उन्हाळयात काम चालु असल्यामुळे उष्माघाताचे प्रमाण वाढल्याने कामात विलंब झाला आहे.

५) सण व इतर कारणांमुळे सदर क्षेत्रस्थळी उपस्थित मजुरांची संख्या फारच कमी झाली. त्यामुळे एप्रिल २०२३ अखेर घरकुल देणे शक्य झाले नाही.

६) तळीये पुनर्वसन प्रकल्पामधील एकूण २७१ घरकुलांचे काम डिसेंबर, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: नागपूर व चंद्रपूर जलसंधारण महामंडळाने विविध जलसंधारणाच्या कामांच्या निविदा प्रक्रियांना स्थगिती देण्याबाबत

**(३५) ६०३५५ (२५-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर व चंद्रपूर जलसंधारण महामंडळाने विविध जलसंधारणाच्या कामांना मंजूरी दिली असून महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या उपरोक्त कामांचे प्रस्ताव, अंदाजपत्रक, निविदा तयार करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांच्या निविदा प्रक्रीया सुरु असतानाच सदर प्रक्रियांना स्थगिती देण्यात आली असून स्थगिती मुळे सदर कामांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीअंती काय आढळून आले, त्यानुसार सदर कामाच्या निविदावरील स्थगिती उठवून कामे तात्काळ सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळांतर्गत नागपूर जिल्हयातील १८४ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी १२७ कामांवरील स्थगिती उठविण्यात आली आहे.
जलसंधारण महामंडळामार्फत चंद्रपूर जिल्हयातील एकूण ५९ गेटेड साठवण बंधा-यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, त्यापैकी ०५ योजनांची स्थगिती उठविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक महापालिकेच्या वेबसाईटवर क्रिकेट सट्टयाचे प्रमोशन होत असलेबाबत**

**(३६) ६०४२८ (११-०५-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेच्या वेबसाईटवर क्रिकेट सट्टयाचे प्रमोशन होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या https://nmc.gov.in/ या वेबसाईटवर ई-सेवेंतर्गत विविध १० सेवा देण्यात आलेल्या आहेत प्रत्येक सेवेच्या टॅबवर क्लिक केल्यानंतर त्या विभागाशी निगडीत पेज उघडते मात्र इमारत प्लॅनच्या टॅबवर क्लिक करताच वेबसाईट रिडायरेक्ट होऊन थेट क्रिकेटच्या सट्टयाची माहिती असलेले nmcobpas.in/ हे पेज उघडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वास्तविक नगररचना विभागाच्या कामात पारदर्शकता यावी आणि हे काम सहजपणे पुढे जावे यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर इमारत प्लॅन परवानगीसाठी ऑनलाईनचा पर्याय दिलेला असून या विभागातील मुखंडांनी ऑनलाईन व्यवस्थेचा जाणीवपूर्वक बोजवारा उडविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरणानुसार माहिती व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामान्य जनतेस शासनाच्या सर्व सेवा माफक दरात प्रभावी, पादर्शकरित्या व जलदगतीने दयावयाच्या आहेत. त्यानुसार नाशिक महानगरपालिकेमार्फत नागरीकांना विविध सुविधा ऑनलाईन सुविधा पुरविण्यात येतात. तरी नाशिक महानगरपालिके मार्फत बांधकाम परवानगी या सेवेकरीता nmcobpas.in डोमेन संबंधित मक्तेदारामार्फत विकत घेण्यात आलेले होते. त्याची मुदत दिनांक १६/११/२०२१ रोजी संपुष्टात आली प्रत्येक डोमेनचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर ठराविक काळानंतर दुसऱ्यास उपलब्ध होऊ शकतो. अशा प्रकारे सन २०२३ मध्ये तो दुसऱ्या संस्थेने घेतलेला निदर्शनास आला आहे. त्या संस्थेने त्या डोमेनवर Is Cricket Online Betting Legal in India ? या आशयाचे बॅनर प्रसिद्ध करण्यात आले आहे ते महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन “इमारत प्लॅन” या टॅबवर क्लिक केल्यानंतर दिसून आल्याचे दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास आल्यानंतर तात्काळ सदर लिंक नाशिक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन हटविण्यात आली.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील रावेर नगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील वसाहतीमध्ये बनावट सह्या करून पोचपावत्या पालिकेकडे जमा केल्याबाबत**

**(३७) ६०६२५ (११-०५-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील रावेर नगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील वसाहतीमध्ये पालिकेने दिलेल्या सुनावणीच्या नोटिसांवर वाटप करणाऱ्या आर. एस. कंट्रक्शन कंपनीच्या प्रतिनिधींनी बनावट सह्या करून नोटीस वाटप न करता पोचपावत्या पालिकेत जमा केल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बोगस सह्या करून पोचपावत्या पालिकेकडे जमा करणाऱ्या संबंधित कंपनीच्या प्रतिनिधींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) अशा आशयाची दि.२० डिसेंबर, २०२२ रोजीची तक्रार रावेर नगरपरिषदेस प्राप्त झाली होती.
(२) व (३) सदर प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्याकरीता आर.एस. कन्स्ट्रक्शन या कंपनीस रावेर नगरपरिषदेमार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

सदर कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने आर.एस. कन्स्ट्रक्शन या कंपनीने सादर केलेल्या खुलाश्यानुसार सुनावणी नोटीसवर कुठलीही बनावट स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे सदर खुलासा रावेर नगरपरिषदेने मान्य केल्याचे जिल्हाधिकारी, जळगाव यांनी अहवालात नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील पत्रकार भवनाच्या इमारतीत अतिक्रमण झाल्याबाबत**

**(३८) ६०८२४ (११-०५-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील पत्रकार भवनाच्या इमारतीत अतिक्रमण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८ मध्ये औंढा रोड भागात उभारण्यात आलेल्या पत्रकार भवनाच्या इमारती संदर्भात शासनाशी केलेल्या कराराचा भंग संस्थेने केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही,

हिंगोली नगरपरिषदेअंतर्गत पत्रकार भवनाच्या इमारतीत अतिक्रमण झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) पत्रकार भवनाच्या इमारतीसंदर्भात हिंगोली नगरपरिषदेने कोणताही करार केलेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालेगाव ,अंबरनाथ(जि.ठाणे) येथील कारखान्यातून दोन टन प्लॅस्टिक जप्त केल्याबाबत.**

**(३९) ६१०१५ (२५-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असतांनाही अंबरनाथ येथील बदलापूर-कटाई महामार्गावरील पालेगाव मधील एका कारखान्यातून प्रदूषण नियंत्रण मंडळाने छापा टाकून तब्बल २ टन प्लास्टिक पिशव्यांचा साठा दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लास्टिक बंदी असतांनाही सर्रास प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असतांनाही राज्यातील स्थानिक प्रशासनाकडून कारवाई करण्यास दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुंषगाने प्लॅास्टिक पिशव्यांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) होय.

दिनांक ०५ जानेवारी,२०२३ रोजी १.५७० टन प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला होता.

(२) नगरपरिषद अंबरनाथ मार्फत प्लास्टिक बंदी अंमजबजावणी संदर्भात वेळोवेळी दंडात्मक कार्यवाही करणेत येते.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टिक पिशव्या उत्पादन करणा-या मे. बालाजी प्लास्टिक या उदयोगाकडून १.५७० टन इतक्या प्लास्टिकच्या पिशव्या जप्त करण्यात येऊन अंबरनाथ नगरपरिषदेकडे त्याची विल्हेवाटी करिता देण्यात आल्या. तसेच अंबरनाथ नगरपरिषदेकडून सदर उदयोगावर दंडात्मक कारवाई करून रू. ५०००/- इतका दंड आकरण्यात आला. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उदयोगास दिनांक ११/०१/२०२३ रोजी उत्पादन बंदचे आदेश बजावण्यात आले असून सदयस्थितीत सदर उदयोग बंद आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नवी मुंबई सिडको महामंडळात आकृतीबंधाप्रमाणे नोकर भरती करण्याबाबत**

**(४०) ६११७१ (११-०५-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई सिडको महामंडळात अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येमुळे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना अधिक कामाच्या भारामुळे शारिरीक व मानसिक त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, रेल्वे, रस्ते, कार्पोरेट पार्क, तसेच मोठ-मोठे गृह प्रकल्प यासारखे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रकल्प उभारणाऱ्या सिडको महामंडळात २८०१ कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर असून केवळ १४६६ कर्मचारी काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामंडळात अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या संख्येमुळे कार्यरत असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांना वाढत्या कामाच्या त्रासामुळे रक्तदाब, मधुमेह, हृदय विकारासारख्या गंभीर आजाराने ग्रासले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिडको महामंडळाने तातडीने नोकर भरती करावी म्हणून अनेक कामगार संघटनांनी मागणी करूनसुध्दा सिडको प्रशासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सिडको महामंडळातील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कामाचा ताण कमी करण्यासाठी तसेच आकृतीबंधाप्रमाणे नोकर भरती करण्यासाठी तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सिडको महामंडळामध्ये सरळसेवा आणि पदोन्नती मिळून २७९८ पदे मंजूर आहेत. सद्यस्थितीत त्यापैकी १२४५ पदे भरलेली असून १५५३ पदे रिक्त आहेत.
(३) व (४) हे खरे नाही.
(५) सिडकोस शासन पत्र दि.८.६.२०२३ अन्वये सुधारित आकृतिबंध निश्चित करुन शासनाची मान्यता घेण्याची कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी (जि.परभणी) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे विद्यार्थी अपात्र केल्याबाबत

**(४१) ६१३८८ (२४-०४-२०२३). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी (जि.परभणी) येथील सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण अधिकारी यांनी शासनाच्या मार्गदर्शना आधीच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे विद्यार्थी अपात्र केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणामुळे येथील अनेक होतकरु विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असून त्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रकरणी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली गठीत समितीकडून चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाच्या आधारे आयुक्तालयाच्या शिफारशीनुसार सदर योजनेच्या निकषामध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील गंगाखेड शहरातील दूषित पाणी प्रक्रिया न करताच नाला व कपिली नदीतून गोदावरी नदीत सोडले जात असल्याबाबत

**(४२) ६१५०१ (२४-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) शहरातील दूषित पाणी प्रक्रिया न करताच नाला व कपिली नदीतून गोदावरी नदीत सोडले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दूषित सांडपाण्यात कॅरिबॅग, प्लास्टिकच्या बाटल्या इतर कचरा गोदावरी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात नदी प्रदूषित होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थावर प्रदूषित सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पाण्याची शुध्दता झाल्यानंतर नदीत सोडण्याचा नियम असतांनाही त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन दूषित पाणी कोणतीही प्रक्रिया न करता नदीत सोडण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे,
तथापि, गंगाखेड नगरपरिषद हद्दीतील सर्व नाले कपिली या मुख्य नाल्याला जोडण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही,
कपिली या मुख्य नाल्यात सांडपाणी सोडत असताना लहान नाल्यांना बसविण्यात आलेल्या लोखंडी जाळ्यांमुळे प्लास्टिक पिशव्या, बाटल्या व इतर कचरा मुख्य नाल्यात जात नाही. सदर कचरा जे.सी.बी. व पोकलेनच्या सहाय्याने साफ करण्यात येतो.
(३) गंगाखेड नगरपरिषदेअंतर्गत पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून दोन नाल्यांचे पुनर्जीवन करणे, STP बांधकाम करुन अशुद्ध पाणी शुद्ध करुन गोदावरी नदी पात्रात सोडणे या कामाकरीता रु.३१६ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भातील कार्यवाही जिल्हाधिकारी, परभणी यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव महानगरपालिकेने अभय योजना जाहीर करुन मालमत्ताधारकांना दंडाच्या रक्कमेत सवलत देण्याबाबत

**(४३) ६१६१५ (१२-०५-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव महानगरपालिकेची शहरातील मालमत्ताधारकांकडे सुमारे २०० कोटी रुपयांची थकबाकी असुन या थकबाकीची वसुली व्हावी यासाठी संबंधित महानगरपालिकेने अभय योजना जाहीर करुन मालमत्ताधारकांना दंडाच्या रक्कमेत सवलत द्यावी असे पत्र महापौर महोदयांना देण्यात आले तसेच यावर निर्णय देण्यात येत नसल्याने पुन:श्च तीन वेळा स्मरणपत्रही देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वीच्या आयुक्तांनी अशीच अभय योजना जाहीर केली त्यानुसार जळगांव महानगरपालिकेकडे मोठया प्रमाणात मालमत्ता धारकांनी रक्कम जमा केली होती परंतू यावर्षी अद्यापही ही योजना जाहीर होत नसल्याने उक्त महानगरपालिकेकडे योजनेअंतर्गत दंडाची रक्कम जमा होत नाही व त्यामुळे नागरिकांना सोयी-सुविधा मिळण्यास ही अडचण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने अभय योजना लागू करुन मालमत्ताधारकांना दंडाच्या रकमेत सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०२३) :** (१) नाही.
मात्र महापौर, जळगाव महानगरापालिका यांनी अभय शास्ती योजना राबविण्याबाबत आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांना पत्र दिलेले आहे.
(२) व (३) यापूर्वीच्या आयुक्तांनी मागील दोन वर्षात शास्ती माफीची अभय योजना कोविड-१९ च्या काळात लागू केली होती मात्र सदर योजनेचा लाभ ज्या मिळकत धारकांकडे मागील ६ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त वर्षाची थकबाकी आहे त्यांनी न घेतल्याचे महानगरपालिकेस दिसून आले असल्याने तदनंतर पडताळणीअंती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड, प्रकरण आठ कराधान नियम ४१ अन्वये आकारलेली शास्ती अंशत: किंवा पूर्णपणे माफ करणेचा

स्वेच्छानिर्णय अधिकार आयुक्त यांना अधिनियमातील नियम ४१ अन्यये प्राप्त असल्याने त्यांनी त्याचा वापर करुन दि.०५/०२/२०२३ पासून ते दि.०५/०३/२०२३ पर्यंत मालमत्ता करावरील शास्ती माफीची अभय योजना सुरु केलेली आहे.

तद्नंतर नागरीकांचा प्रतिसाद पाहून व वसुली पाहून सदर योजनेचा कालावधी वाढविण्या संदर्भात निर्णय अधिनियमाच्या तरतुदीनुसार महानगरपालिकेमार्फत घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव शहरातील (जि.नाशिक) वॉटरग्रेस कंपनीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आंदोलन केल्याबाबत

**(४४) ६२०९६ (११-०५-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव शहरातील (जि.नाशिक) स्वच्छतेचा ठेका घेतलेल्या वॉटरग्रेस कंपनीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास कचरा भरलेली वाहने थेट मनपा प्रवेशद्वारावर नेऊन आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी राज्य शासनाने मनपा घंटागाडी कामगारांना निश्चित केलेले किमान वेतन, वेळोवळी येणारा महागाई भत्ता अदा करावा आदि मागण्यांसदर्भात आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त कंपनीच्या कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार महानगरपालिकेने वेळोवेळी बैठका घेऊन मागण्या पूर्ण करण्याविषयी कार्यवाही केलेली आहे.

वॉटरग्रेस प्रॉडक्टस्, नाशिक यांचेकडील कार्यरत असलेल्या मालेगाव महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेच्या सदस्यांनी दि.२४.०१.२०२३ रोजी संप पुकारला होता. सदर संप सायंकाळी संपुष्टात आलेला आहे. तसेच, आज रोजी मालेगाव महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटनेचे सदस्य वॉटरग्रेस प्रॉडक्टस्, नाशिक यांचेकडेच कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सासवड (जि.पुणे) नगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत

**(४५) ६२१६१ (२४-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सासवड (जि.पुणे) शहराच्या वाढीव हद्दीतील लोकसंख्येचा विचार करून राज्य शासनाने दि. १ जानेवारी, २०१९ रोजी रुपये ५८ कोटी १३ लाख खर्चाचे मंजूर केलेले भुयारी गटार योजनेचे काम प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०७-२०२३) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये ३६.५३ कोटी किंमतीच्या सासवड शहर भुयारी गटार (टप्पा-१) प्रकल्पास दिनांक ३१ डिसेंबर २०१८ रोजी प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पास सन २०१९ मध्ये झालेल्या प्रचंड पावसामुळे, कोविड-१९, स्थानिक अडचणीं, प्रकल्पाच्या नेटवर्क डिझाईनमध्ये सुधारणा करण्याची गरज इ. कारणामुळे प्रकल्पाचे काम विहीत वेळेस पूर्ण करता आले नाही.

सद्यस्थितीस सदर प्रकल्पाची भौतिक प्रगती ८६.७५% झाली असून डिसेंबर, २०२३ अखेर सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे सासवड नगरपरिषदेचे नियोजन आहे.

---

## पाचोरा नगरपालिकेत (जि. जळगांव) सफाई कामगार पदावर कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४६) ६२५१६ (११-०५-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा नगरपालिकेत (जि. जळगांव) सफाई कामगार पदावर कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कामगारांना सदर विशेष बाब म्हणून कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी प्रधान सचिव (नवि-२) यांना प्रस्ताव तपासून सादर करण्याचे आदेश दि.१६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने सादर केलेल्या दि.०६ मार्च, २०२३ रोजीच्या अहवालानुसार, सदर प्रकरणी निर्णय घेण्याची प्रक्रिया शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली नगरपरिषदेच्या वाढीव रुपये २० कोटीच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४७) ६२६४२ (११-०५-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद गडचिरोली अंतर्गत शंभर कोटी रुपयांची भूमिगत गटारी योजनेची कामे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता सदरहू योजना उक्त रकमेत पूर्ण होणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नगरपरिषदेने रुपये २० कोटीचा वाढीव प्रस्ताव शासनास पाठवलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव तातडीने मंजूर केल्यास शहरातील अपूर्णावस्थेत असलेली विकास कामे पूर्ण होण्यास मदत होणार असल्याने उक्त प्रस्तावाबाबत तातडीने निर्णय घेऊन निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०७-२०२३) :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत गडचिरोली शहराच्या रुपये ९६.५० कोटी किंमतीच्या मलनिस्सारण प्रकल्पास दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ रोजी प्रशासकीय मंजूरी प्रदान

करण्यात आली आहे. सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे.
(२) व (३) गडचिरोली शहराची वाढीव लोकसंख्या विचारात घेता गडचिरोली नगरपरिषदेमार्फत भुयारी गटार प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) गडचिरोली नगरपरिषदेचा भुयारी गटार प्रकल्पाचा प्रस्ताव विहित मार्गाने नगरपरिषद प्रशासन संचनालयामार्फत शासनास प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत विचारात घेण्यात येईल.

---

## सिडको प्रशासनाने नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांचे विद्यावेतन पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(४८) ६२९७२ (२४-०४-२०२३). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको प्रशासनाने नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी संपादित केल्याने प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना शिक्षणाकरिता विद्यावेतन सुरु केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिडकोने नवी मुंबई येथे जे विकसित नोड झाले आहे, त्या भागातील प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना विद्यावेतनाची सुविधा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना देण्यात येणारे विद्यावेतन पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांचे विद्यावेतन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१८-०७-२०२३) :** (१), (२) व (३) नवी मुंबई प्रकल्पासाठी ठाणे, पनवेल व उरण या तालुक्यातील एकूण ९५ गावातील जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत व्हावी या उद्देशाने सिडको महामंडळाने सन १९७२ पासून "विद्यावेतन योजना" दहावीनंतर उच्च माध्यमिक ते पदवीधर शिक्षणाकरिता लागू करण्यात आली होती.

सदर संपादित क्षेत्रापैकी बहुतांश भाग विकसित झाल्याने व नवी मुंबई महानगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून कार्यरत असल्याने सिडको संचालक मंडळाचा ठराव क्रमांक ११८१६, दि.२४.३.२०१७ अन्वये ठाणे तहसील येथील प्रकल्पग्रस्त पाल्यांसाठी सुरू असलेली विद्यावेतन योजना बंद करण्यात आली आहे.

सदर ठरावानुसार पनवेल व उरण (जे.एन.पी.टी. वगळता) भागातील सिडकोने नवी मुंबई प्रकल्पासाठी ताब्यात घेतलेल्या व महानगरपालिका हद्दीमध्ये येत असलेल्या प्रकल्पग्रस्त विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाकरिता विद्यावेतन योजना कार्यान्वित आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांसह इतर बांधकामधारकांनी बांधलेली घरे कायम करण्याबाबत

**(४९) ६२९७३ (११-०५-२०२३). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्तांसह इतर बांधकामधारकांनी बांधलेली घरे कायम करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयाकडे दुर्लक्ष करुन सिडकोने तुर्भे सेक्टर -२४ मधील सन १९७८ पासूनचे पुरावे असलेल्या झोपडीधारकांना नोटीसा पाठविल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुर्भे सेक्टर -२४ मधील झोपड्यांचे शासनाच्या आदेशानुसार २००१ मध्ये नवी मुंबई महापालिकेने सर्व्हे केला असून झोपडपट्टी पाससाठीची पावती, मालमत्ताकर पावती, शिधावाटप पत्रिका, विद्युत देयक, आधारकार्ड इतर शासकीय पुरावे असतांना देखील सिडकोने नोटीसा पाठविल्याने रहिवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवी मुंबईतील घरे नियमित करण्यासाठी सिडकोला मसुदा तयार करण्याचे आदेश शासनाने देऊन देखील सिडकोकडून खातरजमा न करता जाणीवपूर्वक अशा प्रकारच्या नोटीसा पाठविल्या जातात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०७-२०२३) :** (१) नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी रहिवासी प्रयोजनार्थ बांधकाम केलेल्या घरांच्या नियमतीकरणाबाबत शासन निर्णय दि.२५.०२.२०२२ आणि दि.०७.१२.२०२२ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.
(२) तुर्भे, सेक्टर-२४ मधील सिडकोच्या भूखंडावर झोपडीधारकांनी केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत दि.०२.०१.२०२३ रोजी सिडकोमार्फत नोटीस बजावण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सहाय्यक आयुक्त, (मावळ) पुणे विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडून वर्ग १ व २ श्रेणीच्या रोस्टरची तपासणी केल्याबाबत**

**(५०) ६३३०७ (२५-०४-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सहाय्यक आयुक्त (मावळ) पुणे विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांना फक्त वर्ग ४ व वर्ग ३ यांचेच रोस्टर तपासण्याचे अधिकार असतानाही, त्यांनी सन २०१४ मध्ये वर्ग २ व वर्ग १ यांचे रोस्टर तपासणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांनी या कालावधीत १०० बिंदू नामावली रोस्टरमध्ये आदिवासी मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची नोंदीतील आरक्षित ७ बिंदूंवर नोंद केली नाही तसेच बिगर आदिवासी गटातील कर्मचाऱ्यांच्या नोंदी २, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३ या बिंदूंवर केल्या आहेत, त्यामुळे पदोन्नतीचा फायदा आदिवासी कर्मचारी ऐवजी बिगर आदिवासी गटातील उमेदवारांना झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन १९९७ ते २०१७ अखेर रोस्टर तपासणी न करता सेवा भरती प्रक्रिया व पदोन्नती दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बढतीस पात्र असतानाही पदोन्नतीपासून डावलले असून सदर आदिवासी कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक देऊन झालेले सर्व आर्थिक नुकसान व सेवा जेष्ठता पुढील पदोन्नती देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर रोस्टरची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२३) :** (१) दि.५.११.२००९ च्या शासन परिपत्रकाच्या प्रपत्र-अ नुसार वर्ग -३ व वर्ग-४ च्या बिंदुनामावलीस मान्यता देण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त (मावक) यांना आहेत. तसेच वर्ग-२ व वर्ग-१ च्या बिंदुनामावलींची प्राथमिक तपासणी सहाय्यक आयुक्त (मावक) यांच्यामार्फत केली जाते व अंतिम तपासणी सचिव,

सामान्य प्रशासन विभाग (मावक) यांच्याकडून केली जाते. सहाय्यक आयुक्त (मावक), पुणे यांनी सन २०१४ मध्ये वर्ग-२ व वर्ग-१ च्या रोस्टरची अंतिम तपासणी केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.